**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, SEPT-OCT, 2019, VOL- 7/53*

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थींना मातृभाषा मराठी शिक्षण, स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती (पेपर क्रमांक१०६) या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास

**प्रा .कैलास आर .खोंडे, Ph. D.**
*( असि. प्रोफेसर), म. वि. प्र. समाज, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

**दैनंदिन अध्ययन अध्यापनात शिक्षक विविध अध्ययन अध्यापन पद्धतींचा वापर करत असतात ,विद्यार्थीही वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून अध्ययन करीत असतात तरीही काही संकल्पना कठीण वाटतात ,अशा वेळेस शिक्षकाकडून काही नवीन उपक्रम आखणे गरजेचे असते .संशोधक व मार्गदर्शक हे बी .एड शी संबंधित असल्या कारणाने बी .एड .च्या विद्यार्थ्यांना खास करून आशयज्ञान अभिवृद्धीसाठी असलेले मराठी व्याकरणाशी संबंधित विषय नेहमीच कठीण व आव्हानात्मक वाटत असतो त्यामुळे प्रस्तुत विषयासंबंधी काम करण्याचे ठरविले असता त्यावर विद्यार्थ्यांसाठी स्वयम अध्ययन पुस्तिका करावी असा विचार केला व त्याचे परिणामही सकारात्मक पहावयास मिळाले .**

**१) संशोधनसमस्याविधान :**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थींना मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती (पेपर क्रमांक १०६) या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती करून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे .**

**२) संशोधन समस्येचे स्पष्टीकरण**

**बी.एड्. प्रशिक्षणार्थींना मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धती (पेपर क्रमांक १०६) याविषयाचे अध्ययन कठीण जाते. प्रशिक्षणार्थींना याविषयाचे अध्ययन करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा अडचणी प्रशिक्षणार्थींना अध्ययन प्रक्रिये दरम्यान निर्माण होऊ नये याकरिता प्राध्यापकांनी प्रयत्न करणे आवश्यक असते. संशोधकाला असे वाटते की, प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययन पुस्तिका तयार करून ती पुस्तिका प्रशिक्षणार्थींना देऊन प्रशिक्षणार्थींची अपेक्षित प्रगत पातळी गाठणे व स्वयंअध्ययन पुस्तिकेचा परिणाम प्रशिक्षणार्थींच्या अध्ययनावर कसा होणार आहे हे अभ्यासणे.**

**३) संकल्पनात्मक व्याख्या**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थी**

**शिक्षकाच्या व्यवसायासाठी सामान्यतः पदवी शिक्षणानंतर करता येणारे प्रशिक्षण व ते घेणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक किंवा बी.एड्. प्रशिक्षणार्थी होय. ( डॉ.हेमंत चित्ते, शैक्षणिक संशोधन : मांडणीव दिशा, सात्विक प्रकाशन)**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२) स्वयंअध्ययन पुस्तिका**

**स्वप्रयत्नाने केलेल्या अध्ययनास स्वयंअध्ययन असे म्हणतात आणि स्वयंअध्ययनास मार्गदर्शक ठरणारी पुस्तिका म्हणजे स्वयंअध्ययन पुस्तिका.** ( **म.बा. कुंडले, शिक्षण समीक्षा** )

**३) परिणामकारकता**

**परिणामकारकता म्हणजे अचूक आणि योग्य ते काम करणे आपल्या अथवा एखाद्या उपक्रमाचा एखाद्या घटकांवर पडणारा धनात्मक प्रभाव.** (**सरॲटनी-जे** Schor-google art.com )

**४) कार्यात्मक व्याख्या**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थी**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक या व्यवसायाकरिता प्रशिक्षण घेणारी व्यक्ती म्हणजे बी.एड्. प्रशिक्षणार्थी.**

**२) स्वयंअध्ययन**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थीचे अध्ययन सुलभ व्हावे याहेतुने विकसीत केलेली स्वयंअध्ययन पुस्तिका.**

**३) परिणामकारकता**

**मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धती** (**पेपर क्रमांक१०६**) **याविषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनक्षमतेत होणारी वाढ**

**५) संशोधन प्रश्न**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थीना** (**पेपर क्रमांक१०६**) **मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या अध्ययनात कोणत्या अडचणी येतात?**

**२) काही उपाययोजना राबविल्या असता** (**पेपर क्रमांक१०६**) **मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती याविषयाचे अध्ययन परिणामकारक होईल का ?**

**६) संशोधनाचीउद्दिष्टे**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांच्या पेपर क्रमांक१०६ मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाचे अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती करणे.**

**२) बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांच्या पेपर क्रमांक१०६-९६ मातृभाषा मराठी शिक्षण, स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या अध्ययनासाठी तयार केलेल्या स्वयंअध्ययन पुस्तिकेची परिणाम कारकता अभ्यासणे.**

**७) गृहितके**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थीना शैक्षणिक समस्या व शैक्षणिक नियमाचे अध्ययन करताना अडचणी येतात.**

**२) बी.एड्. प्रशिक्षणार्थीना कोणत्याही विषयाचे टिपणे काढतांना अडचणी येत असतात.**

**३) बी.एड्. प्रशिक्षणार्थीना केवळ क्रमिक पुस्तकाचे वाचन करून पुरेसे ज्ञान आकलनात करण्यास अडचणी येतात.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

(एम. एड्. संशोधक : छाया जाधव)

८) परिकल्पना

संशोधन परिकल्पना

जर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांनी (पेपरक्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षणस्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती याविषयाच्या अध्ययनाकरिता स्वयंअध्ययन पुस्तिकेचा उपयोग केला तर त्यांच्या ज्ञान आकलन पातळीत वाढ होईल.

शून्य परिकल्पना

जर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांनी (पेपरक्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धती याविषयाच्या अध्ययनाकरिता स्वयंअध्ययन पुस्तिकेचा उपयोग केला तरी त्याच्या ज्ञान आकलनात वाढ होत नाही..

९) संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा

संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तुतसंशोधन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या बी.एड्. प्रशिक्षणार्थीसाठी व्याप्त आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाशी संबंधित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे बी.एड्. प्रशिक्षणार्थीच्या अध्ययनाकरिता आहे.

४) प्रस्तुत संशोधन हे (पेपर क्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाशी संबंधित आहे.

संशोधनाची मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन नाशिक जिल्ह्यातील अॅड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे. ...

२) प्रस्तुत संशोधन (पेपरक्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षण व्याकरणावर आधारित घटकापुरतेच मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापुरतेच मर्यादित आहे.

संशोधन परिमर्यादा

१) प्रस्तुत संशोधन हे अॅड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी विषयापुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे मराठी विषय व्याकरणातील घटकांवर अवलंबून आहे.

३) प्रस्तुत संशोधन निष्कर्ष त्या विषयातील विद्यार्थ्यांना लागू राहतील.

१०) संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

प्रस्तुत संशोधनासाठी एम .एड स्तरावरील 2 ,एम फिल स्तरावरील 3 ,पीएचडी स्तरावरील 3 संशोधनांचा आढावा घेतला .

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तर 7 पुस्तकांचाही आढावा घेण्यात आला असून एकूण 15 संशोधन व साहित्यांचा आढावा घेण्यात आला .

११) संशोधनाची चले

१) स्वाश्रयी चल : स्वयंअध्ययन पुस्तिका

२) आश्रयीचल : बी.एड्. प्रशिक्षणार्थीचे (पेपर क्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षण, स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या संपादनात झालेली वाढ.

१२) संशोधनपद्धतीची निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे.

१३) जनसंख्या

नाशिक जिल्ह्यातील ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विषय मराठी अध्यापन पद्धती असणारे विद्यार्थी शिक्षकही संशोधनाची जनसंख्या आहे.

१४) नमुना निवड

नाशिक जिल्ह्यातील ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्ययन-अध्यापन पद्धती असणाऱ्या 80 टक्के विद्यार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने केली आहे.

१५) संशोधन साधने

सदर संशोधनामध्ये प्रायोगिक पद्धतीचा अवलंब केल्याने संशोधाकाने स्वनिर्मित चाचणीचा वापर केलेला आहे.

१६) संख्याशास्त्रीय विश्लेषण

प्राप्त सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी चाचणी सोडवून घेतली. (पूर्व व उत्तर चाचणी) विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी , प्रमाण विचलन व टी परीक्षिका या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यातआला.

१७) उद्दिष्टानुसार निष्कर्ष

१) बी.एड्. प्रशिक्षणार्थीच्या (पेपर क्रमांक १०६) मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धतीया विषयाच्या स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती करणे.

२) बी.एड्. प्रशिक्षणार्थीच्या (पेपर क्रमांक १०६) मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या अध्ययनाकरिता स्वयंअध्ययन पुस्तिकेची परिणामकारकता अभ्यासणे.

पूर्वचाचणीचे मध्यमान१०.५०आहे. पूर्वोत्तर चाचणी मध्यमान२०.६३आहे. चाचणी

मध्यमान पूर्वचाचणी १०.५०उत्तरचाचणी २०.६३ पूर्वोत्तर चाचणीतील मध्यमानात वाढ दिसून येते. याचाच अर्थ असा की संशोधकाने तयार केलेली स्वयंअध्ययन पुस्तिका बी.एड्. प्रशिक्षणार्थी करिता योग्य ठरली आहे. त्यामुळेच संशोधकाने संशोधन परिकल्पनांचा स्विकार केलेला आहे. आणि शून्य परिकल्पना जर शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थीनी पेपर क्रमांक१०६ मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या स्वयंअध्ययन पुस्तिकेचा वापर केला तरी त्यांच्या अध्ययनात परिणामकारक संपादन होत नाही. याशून्य परिकल्पनाचा त्याग केला आहे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**मुख्यनिष्कर्ष**

**पूर्वचाचणी आणि उत्तर चाचणीतील मध्यमानातील फरक १०.१६९ आहे. 't' मूल्य१०.५८ असल्याने०.०५ स्तरावर मध्यमानातील फरक सार्थकआहे. तो योग्य पद्धतीने सांख्यिकी परिणामे वापरल्याने काढला आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थींच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिका परिणामकारक ठरली आहे.**

**१८) शिफारशी**

**शिक्षकांसाठी शिफारशी**

**१) बी.एड्. प्रशिक्षणार्थींना (पेपरक्रमांक१०६) मातृभाषा मराठी शिक्षण स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती या विषयाच्या अध्ययनाकरीता आवड निर्माण व्हावी याकरिता स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती करावी.. .**

**२) विषयाचे अध्यापन करत असतांना अधिकाधिक उदाहरणे सांगून अध्यापन करावे .**

**३)प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययनाची रूची निर्माण करण्याकरिता उपक्रम राबविणे.**

**प्रशिक्षणार्थीसाठी शिफारशी**

**१) प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययनाची सवयी लावावी.**

**२) प्रशिक्षणार्थी हे उद्याचे शिक्षक आहे. प्रशिक्षणार्थींना व्याकरणाचे सखोल ज्ञान असावे.**

**३) प्रशिक्षणार्थी स्वयंअध्ययन पुस्तिकांचा उपयोग करतांना स्वयंअध्ययनाचे महत्त्व समजून जेकठीण वाटणाऱ्या भागावर शिक्षकांकडून मार्गदर्शन घेऊन आपली प्रगती साधावी. ..**

**संदर्भ**

**मराठी संदर्भ** :

*आगलावे, प्र.(2000 ) संशोधन पद्धती, शास्त्र व तंत्र, नागपूर : विद्या प्रकाशन*

*बापट, भा.गो. (१९८८) : शैक्षणिक संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन. चित्ते, हेमंत (२०१४) : शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा*

*नाशिक : श्री प्रकाशन*

*बोरसे, सी. एम , व दोंड, जी. आर.(2009) अनुदेशण प्रणाली , नाशिक : नेहा प्रकाशन , प्रथमावृत्ती .*

*भिंताडे, वि.रा. (१९०५) : शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे : नूतन प्रकाशन*

*मुळे, रा.शं. आणि उमाठे, वि.तु. (१९८७) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे.*

*संत, दु.का. : संशोधनपद्धती, प्रक्रिया, अंतरंग पुणेविद्यार्थीगृहप्रकाशन, पुणे*

**इंग्रजी संदर्भ** :

*Best, J.W.& Kahn J.V. (1998) Research in Education ,New Delhi : Educational Research and Training*

*Garrett H.E. (2005) statistics in psychology and education ,New Delhi,Paragon international publisher* .

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*